वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- गुरूवार दि. १६ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३



# सैफ इज अनसैफ

## अभिनेता सैफ अली खानवर प्राणघातक हल्ला



Email.- dailydivyawarta@Gmail.com Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या आरोपीची ओळख पटली

### घरात काम करणाऱ्या दोन महिलांना पोलिसांनी चौकशीसाठी नेलं!

**मुंबई, (दिव्य न्युज):- बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान यांच्या घरात घुसून अज्ञात इसमाने थेट सैफ अली खानवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याची खळबळजनक घटना मध्यरात्री बांद्रा स्थित घरामध्ये घडल्याने पुन्हा एकदा राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सैफ अली खान या हल्ल्यात जखमी झाला असून रात्रीच त्याला लिलावती रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. आज सकाळी त्याच्यावर छोटीशी शस्त्रक्रिया करून त्याच्या पाठीत अडकलेले धारदार शस्त्र बाहेर काढण्यात आले. सदरची घटना मुंबई पोलिसांनी गांभीर्याने घेतली असून आरोपीच्या शोधासाठी १५ टिम तयार करण्यात आल्या आहेत. यामध्ये गुन्हे अन्वेषण विभागाच्या आठ टिम आहेत तर दस्तुरखुद्द एन्काऊंटर स्पेशलिस्ट दयानायक हेही या घटनेचा तपास करत आहेत.**

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याचा पश्चिम वांद्रे भागात आलिशान बंगला आहे. या भागात मोठमोठे लोक राहत असून सातत्याने या भागाची सुरक्षा लक्षात घेता पोलीस यंत्रणा सतर्क असते. रात्री सैफ अली खान, करीना कपूर आणि तिच्या दोन मुलांसह घरातील अन्य नोकर आणि फ्लोअरींगचे काम करणारे मजूर घरामध्ये होते.

रात्री उशिरा अचानक घरामध्ये एक अनोळखी इसम डेरेदाखल झाला. त्याने सुरुवातीला घरातील महिलेसोबत हुज्जत घालायला आणि मारहाण करायला सुरुवात केली. त्या दरम्यान सैफ अली खान हा त्याठिकाणी आला असता या अज्ञात हल्लेखोराने सैफ अली खानवर धारदार शस्त्राने वार केले. हल्लेखोराच्या हल्ल्यात सैफ अली खानच्या

मानेला, मणक्याला मोठी दुखापत झाली. अचानक हल्ला झाल्याने घरात एकच गोंधळ उडाला. करीना कपूर हिने सैफला लिलावती रुग्णालयामध्ये पहाटे साडेतीन वाजता दाखल दाखल केले. सैफ याच्या अंगावर एकूण सहा जखमा असून त्यापैकी दोन जखमा खोलवर आहेत. आज सकाळी डॉक्टरांनी त्यावर शस्त्रक्रिया केल्याचे सांगण्यात आले. बॉलीवुड

अभिनेता सैफ अली खान

▶▶ पान २ वर

## कराड कुटुंबीयांची घेतली भेट; पण व्यापाऱ्यांकडे फिरवली पाठ

### मंत्री धनंजय मुंडे यांच्या भूमिकेबद्दल परळीकरांमध्ये नाराजी



बीड, (दिव्य न्युज):-: वाल्मीक कराड याला 'मकोका' लावल्यानंतर धनंजय मुंडे परळी शहरात बंद पुकारण्यात आला. मात्र, शहर सलग दुसऱ्या दिवशीही बंद राहिले. शहरातील बाजारपेठ पूर्ववत सुरू करण्यासाठी मंत्री धनंजय मुंडे यांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याची चर्चा परळीकरांमध्ये पाहावयास मिळत आहे. कराड कुटुंबीयांना भेटण्यास वेळ मिळाला; पण ज्यांनी मतदान करून निवडून आणले, ज्या

▶▶ पान २ वर

## सीडीआर काढायची एवढीच हौस आहे ना

### आ.धस अन् बसवराज यांचा सीडीआर काढा-मंजिली कराड

परळी , (दिव्य न्युज):- वाल्मिक कराड याच्यावर मकोका आणि हत्येच्या कटात सहभागी असल्याचा ठपका ठेवून एसआयटीने कारवाईचा फास अधिक घट्ट केला. खंडणी प्रकरणात वाल्मिक कराड याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावलेली असताना देशमुख हत्या प्रकरणात गुन्हे अन्वेषण विभाग आणि विशेष चौकशी पथकाने चौकशीसाठी ताबा मागितला. या सगळ्या घडामोडी केजमध्ये घडत असताना परळीत कराडवरील कारवाईचे पडसाद उमटले. वाल्मिक कराड याच्या कुटुंबियांनी आणि समर्थकांनी

▶▶ पान २ वर




## बीड जिल्ह्यात आतापर्यंत १६२ लोकांचे पिस्तूल परवाने रद्द

### गरज नसतानाही पिस्तूल परवान्याची खिरापफत!

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्यातील गन कल्चर चांगलेच समोर आले होते. सामाजिक कार्यकर्ते अंजली दमानिया, भाजप आमदार सुरेश धस यांनी बीड

▶▶ पान २ वर



## संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपी नाशिकमध्ये?

### कृष्णा आंधळेच्या 'त्या' फोटोमुळे एकच खळबळ

बीड , (दिव्य न्युज):- सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामुळे राज्यातील सामाजिक आणि राजकीय वातावरण ढवळून निघालं आहे. हत्येचा कट रचल्याचा आरोप करत वाल्मिक कराड याच्यासह इतर आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. शिवाय बुधवारी (ता.१५) कराडला सात दिवसांची पोलिस कोठडी देखील सुनावण्यात आली आहे.

एकीकडे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी न्यायाधीशांची चौकशी समितीची

▶▶ पान २ वर



## वाल्मिकच्या मोबाइलमध्ये अमेरिकेचे सीमकार्ड

### ३ फोनमधून खळबळजनक खुलासा

बीड , (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी दररोज नवनवीन अपडेट समोर येतायत. दोन दिवसांपूर्वी सीआयडीनं वाल्मीक कराडवर मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईनंतर वाल्मीक कराडसमोरील अडचणी वाढल्या आहेत. त्याच्या सुटकेचे मार्ग बंद होताना दिसत आहेत. अशात आता वाल्मीक कराडचं अमेरिका कनेक्शन देखील समोर आलं आहे. काही दिवसांपूर्वी पोलिसांनी वाल्मीक कराडचे तीन मोबाईल जप्त केले होते. यातून आता खळबळजनक खुलासा समोर आला आहे.खरं तर, वाल्मीक कराडने संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपी विष्णू चाटे याच्या फोनवरून पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संवाद

▶▶ पान २ वर

## बेकायदेशीर लाऊडस्पीकरवर किती कारवाई केली?

### उच्च न्यायालयाने राज्य सरकार, पोलिस महासंचालकांकडून मागितली माहिती

मुंबई, (दिव्य न्युज):- राज्यातील धार्मिक आणि अन्य स्थळांवर लावलेल्या बेकायदेशीर लाऊडस्पीकरवर केलेल्या दंडात्मक कारवाईचा तपशील देण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने मंगळवारी राज्याच्या गृहविभागाला आणि पोलिस महासंचालकांना दिले.

याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या आरटीआय उत्तरात २,९४० लाऊडस्पीकरवर कारवाईसंदर्भात बेकायदेशीर केलेल्या पोलिस महासंचालकांच्या गृहविभागाच्या आणि अतिरिक्त सचिवांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश मुख्य न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय व न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठाने दिले.

धामिक किंवा अन्य स्थळांवर लावण्यात येणाऱ्या बेकायदशीर लाऊडस्पीकरवर कारवाई करण्यासंदर्भात २०१६ मध्ये न्यायालयाने

▶▶ पान २ वर

## मुंडे बहीण भावाने देशमुख कुटुंबाची भेट घेतली का? सोनवणेंचा सवाल

बीड , (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या गुन्ह्यात संशयित वाल्मीक कराडला मंगळवारी (१४ जानेवारी) आरोपी करून त्याच्यावर मकोकानुसार कारवाई करण्यात आली होती. यानंतर वाल्मीक कराडला बुधवारी केज सत्र न्यायालयाने ७ दिवसांची २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी अद्याप एक आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. हे प्रकरण विरोधकांनी सुरुवातीपासूनच लावून धरले आहे. अशातच धनंजय मुंडे यांनी वाल्मीक कराडच्या कुटुंबाची भेट घेतल्याचा दावा केला जात आहे. याप्रकरणी आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनावणे यांनी मुंडे बहीण भावाने देशमुख कुटुंबाची भेट घेतली का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच गृहखाते आणि महायुती सरकारवरही टीका केली आहे.



माध्यमांशी संवाद साधताना बजरंग सोनवणे म्हणाले की, या प्रकरणातील

▶▶ पान २ वर

## वाल्मिक कराडसाठी पेटवून घेणाऱ्याची ओळख पटली

### कुंटणखाना प्रकरणात झाली होती पत्नीला अटक

बीड , (दिव्य न्युज):- एकीकडे वाल्मिक कराड याला मोक्का लागला तर दुसरीकडे राज्याचे वातावरण पेटले. याला कारण आहे त्याचे समर्थक. वाल्मिक कराडला चुकीच्या गुन्ह्यात अटक केली असून त्याची ताबडतोब सुटका करावी, या मागणीसाठी त्याच्या समर्थकांनी कराडला मोक्का लावताच १० मिनिटांत परळी बंद केली.

यामुळे परळीत तणावाचे वातावरण पाहायला मिळाले. तर दुसऱ्या दिवशीही व्यापाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला. काल त्याला पोलीस कोठडी सुनावताच कोर्टाबाहेर देखील समर्थकांनी गदारोळ घातला. यामुळे पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला होता.

हे प्रकरण इथंवरच थांबले नाही. तर कराडच्या समर्थनार्थ दोन व्यक्तींनी पेटवून घेतले होते. कराडसाठी जीव देणारे ते दोघे कोण? अशा चर्चांना उधाण आले होते. अशातच आता त्या दोघांची नावे समोर आली असून एकाची माहिती समोर आली आहे. पेटवून घेणाऱ्या एकाचे नाव दत्ता जाधव (राहणार फुलेनगर परळी) असे आहे. तर तीन वर्षांपूर्वीच्या बातमीनुसार कुंटणखाना चालवणाऱ्या ज्या महिलेला अटक झाली होती तिचे नाव जयश्री दत्ता जाधव (राहणार फुलेनगर परळी) असे आहे.

▶▶ पान २ वर






# काँग्रेसचे आता नवे मुख्यालय

## सोनिया गांधींच्या हस्ते सहा मजली इंदिरा भवनचे उदघाटन, टॉप फ्लोअरला बसणार अध्यक्ष



नवी दिल्ली, (वृत्तसेवा):– काँग्रेस संसदीय पक्षाच्या प्रमुख सोनिया गांधी यांच्या हस्ते बुधवारी '९ए कोटला मार्ग' येथील सुसज्ज व अत्याधुनिक अशा 'इंदिरा भवन' या काँग्रेस मुख्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. पूर्वी '२४, अकबर रोड'वर काँग्रेसचे मुख्यालय होते. तब्बल ४७ वर्षानंतर काँग्रेस मुख्यालयाचा पत्ता बदलला आहे.

नवीन मुख्यालयाचे उद्घाटन काँग्रेसच्या इतिहासातील एक महत्त्वाचा क्षण ठरला आहे. मुख्यालयाच्या उद्घाटनावेळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी पक्षाध्यक्ष राहुल गांधी, काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी, के.सी. वेणुगोपाल यांच्यासह पक्षाचे इतर वरिष्ठ नेते उपस्थित होते.

अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या नवीन अत्याधुनिक केंद्रीय मुख्यालयाला इंदिरा गांधी भवन असे नाव देण्यात आले असून, ते काँग्रेस पक्षाच्या दिग्गज नेत्यांचा दृष्टिकोन कायम ठेवण्यासाठी सतत केल्या जाणाऱ्या प्रयत्नाचे प्रतीक असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. काळानुसार पुढे जाण्याची व नवीन गोष्टी आत्मसात करण्याची वेळ आली असल्याचे उद्घाटनप्रसंगी एआयसीसीचे संघटन सचिव वेणुगोपाल यांनी स्पष्ट केले. सोनिया काँग्रेसच्या अध्यक्ष असतानाच्या काळात या भवनाच्या बांधकामाला सुरुवात झाली होती

पान ४ वरून

### बीड तालुका पतसंस्था

संचालक मंडळ व अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या निवडीची प्रक्रिया अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पडली. सन २०२५ ते २०३० या कालावधी करता निवड झालेल्या संचालक मंडळामध्ये श्री.कल्याण आखाडे व श्री.प्रकाश कवठेकर यांच्यासह श्री.लहुराव राऊत, श्री.रविंद्र वाघमारे, श्री.रघुनाथ खरसाडे, श्री.सखाराम शिंदे, सौ.सुवर्णमाला संतराम शिंदे, सौ.शिवकन्या अशोक राऊत, सौ.बालिका संतोष सपकाळ यांचा समावेश आहे. संचालक मंडळाच्या पहिल्या मासिक सभेत रिक्त असलेल्या २ जागांसाठी व स्वीकृत संचालकांच्या २ जागांसाठी निवड करण्यात येणार आहे. या निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहकार अधिकारी म्हणून पी.एस.रोडे यांनी काम पाहिले तर सहकार अधिकारी एस.एल. बेटकर व सावता नागरी पतसंस्थेचे व्यवस्थापक रमेश मदने यांनी सहकार्य केले.

### मराठी पत्रकार परिषदेच्या तीन

संजय सानप यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई यांच्याकडून दिला जाणारा दर्पण पुरस्कार मिळाला. तसेच पत्रकार अनिल गायकवाड यांना ठाणे येथील साहित्यिक साहित्य वारी या दैनिकाचा पुरस्कार मिळाला आहे. या मराठी पत्रकार परिषदेच्या पत्रकारांनी अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केला आहे. अनेक पुरस्कारही प्राप्त झाले आहे. यावर्षी या तिघांनाही पुरस्कार मिळाल्याने मराठी पत्रकार परिषदेकडून तिघांचाही सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यांचा ज्येष्ठ पत्रकार छगनराव मुळे, इद्रिस चाऊस, अब्दुल कादर मकरानी, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सत्कार संपन्न झाला, यावेळी पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष राजू भैया जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष अजय जोशी, काँग्रेस तालुकाध्यक्ष राहुल जाधव, शिवसेना तालुका अध्यक्ष मुकुंद शिंदे,अक्षय कांकरिया, ज्येष्ठ पत्रकार दयानंद सोनवणे, हमीद पठाण, अशोक भवर, जावेद शेख, हरिदास शेलार, नानासाहेब डिडुळ, दत्ता देशमाने, सतीश गर्जे, फयाज सय्यद, दिगंबर नाईकनवरे, सचिन शिंदे यांच्यासह अनेक पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सेलू येथे होणाऱ्या कार्यक्रमाचे देखील केलं नियोजन

सेलू जिल्हा परभणी येथे एक फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि तालुका अध्यक्षांचा मेळावा हा मोठ्या उत्साहात होणार आहे त्याच अनुषंगाने पुणे ते सेलू पत्रकार एकता रॅली पाटोदा नगरीत येणार आहे त्या अनुषंगाने देखील आज कार्यक्रम संपल्यानंतर नियोजन करण्यात आले पत्रिका आल्यानंतर सविस्तर आढावा घेऊन पत्रकार एकता रॅलीच जंगी स्वागत पाटोदा शहरांमध्ये केलं जाणार असल्याची माहिती देखील मिळाली आहे.

### विचारांचा जरागर घडविणारा

जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद, पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व शब्दसह्याद्री प्रतिष्ठान, जिंतूर यांचे मार्गदर्शक म्हणून त्यांनी खंबीर भूमिका बजावली.

श्री. भास्कर पिंपळकर हे फक्त ग्रंथालय शिक्षक , ग्रंथमित्रच नव्हते, तर वाचन संस्कृतीचे खरे पाईक होते. १९८७ साली परभणी जिल्ह्यातील जांब (खुर्द) या गावी त्यांनी शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयाची स्थापना केली. सुरुवातीला अडचणींचा सामना करत, एका छोट्या खोलीतून सुरू केलेल्या या वाचनालयाने आज 'अ' दर्जा प्राप्त केले आहे. या वाचनालयाला मिळालेला राज्य शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार त्याच्या यशाची साक्ष आहे. श्री. पिंपळकर यांनाही २०१३ साली 'ग्रंथमित्र' या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ग्रंथालयाची वाटचाल केवळ पुस्तकांचे भांडार उभे करण्यात मर्यादित नव्हती. श्री. पिंपळकर यांनी वाचनसंस्कृतीला एक चळवळ बनवले. त्यांनी ग्रामीण भागातील वाचकांसाठी उपक्रमशीलता दाखवत बालविभाग, महिला विभाग, अद्यावत वाचन कक्ष, आणि इंटरनेट सेवा उपलब्ध करून दिल्या. विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी विशेष ग्रंथसंपदा तर महिलांसाठी विविध उपक्रम राबवले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरवसोहळ्याचे आयोजन, उत्कृष्ट वाचक पुरस्कार यांसारख्या कार्यक्रमांमधून वाचन संस्कृतीची रुजवात केली. ग्रंथालय चळवळीत त्यांचे योगदान अद्वितीय होते. जिंतूर तालुक्यात त्यांनी प्रेरणेने ७५ हून अधिक ग्रंथालये कार्यरत केली. त्यांनी ग्रंथ हेच गुरु या विचाराने वाचन संस्कृतीचा प्रचार केला. ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजवून समाजाची प्रगती साधण्याचा त्यांचा दृष्टिकोन प्रेरणादायी होता. त्यांच्या प्रयत्नांनी ग्रामीण भागातील समाज संस्कारित व विचारी झाला. आज, शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालय २५,००० हून अधिक ग्रंथांच्या संग्रहासह, परभणी जिल्ह्यात वाचनसंस्कृतीचा दीपस्तंभ ठरले आहे. हे केवळ पुस्तकांचे भांडार नसून, समाजातील प्रत्येक घटकाला विचारशील बनवण्याचे माध्यम आहे. भास्कर पिंपळकर यांच्या नेतृत्वामुळे या ग्रंथालयाला राजाराम मोहन रॉय प्रतिष्ठान, केंद्रीय हिंदी निदेशालय, आणि साहित्य व संस्कृती मंडळ यांसारख्या संस्थांचे सहकार्य लाभले. श्री. पिंपळकर यांनी वाचन संस्कृतीसाठी केलेले कार्य हे नव्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. त्यांच्या निधनाने वाचन चळवळीला मोठा धक्का बसला असला तरी त्यांनी रुजवलेली विचारसंस्कृती व ग्रंथालय चळवळ यामुळे ते सदैव स्मरणात राहतील. ग्रंथ हेच मार्गदर्शक आणि समाजप्रबोधनाचे साधन आहे हे पटवून देणाऱ्या भास्कर पिंपळकर यांचे कार्य इतिहासात अजरामर राहील.

बाळू आसाराम बुधवंत नूतन विद्यालय, सेलू

पान १ वरून

### सैफ इज

याच्यावर झालेल्या हल्ल्याची गंभीर दखल पोलीस प्रशासनाने घेतली आहे. पहाटेपासून पोलीस या घटनेतील आरोपीच्या शोधासाठी प्रयत्नशील असून मुंबई पोलिसांची तब्बल पंधरा पथको या घटनेचा तपास करत आहेत. यामध्ये आठ पथके हे गुन्हे अन्वेषण विभागाचे आहे तर एन्काऊंटर स्पेशलिस्ट दयानायक हेही या घटनेचा तपास करत आहेत. मुंबई पोलिसांनी सुरुवातीला सीसीटीव्ही फुटेजद्वारे तपास सुरू केला असून तपासाअंती एका फुटेजमध्ये दोन संशयित व्यक्ती आढळून आले आहेत. या घटनेने पुन्हा एकदा राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केला आहे. हाय प्रोफाईल वांद्र्यात ही घटना घडल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

सैफ अली खानवरील हल्ला प्रकरणातल्या आरोपीची पोलिसांना ओळख पटल्याचं समोर आलं आहे. या आरोपीला लवकरच अटक केली जाईल असं पोलीस उपायुक्त दीक्षित गेडाम यांनी स्पष्ट केलंय. दरम्यान पोलिसांनी या प्रकरणात कलम १०९ अंतर्गत हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केलाय. त्यासह इतर कलमांअंतर्गतही विविध गुन्हे दाखल केलेत. आरोपी जिन्यावरून १२ मजले चढून वर आला आणि सैफ अली खानच्या घरात शिरला. सैफ अली खानच्या घरात तो चोरीच्याच उद्देशाने शिरल्याचं तपासात समोर येतंय, असं पोलीस उपायुक्त गेडाम यांनी स्पष्ट केलंय. हल्ल्याच्या विविध पैलूंचा तपास करण्यासाठी पोलिसांच्या १० टीम कार्यरत आहेत अशी माहितीही उपायुक्त गेडाम यांनी दिली आहे.

सैफ अली खानच्या घरी काम करणाऱ्या दोन महिलांची पोलीस चौकशी करत आहे. यातील एका महिलेच्या हाताला जखम असल्याचे दिसतंय. या दोघींची पोलीस चौकशी करत आहेत. सैफ अली खानच्या घरी काम करणाऱ्या एरियामा फिलिप्स उर्फ लिमा याच्या तक्रारीच्या आधारावर वांद्रे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरोपीवर ट्रेस पासिग, चोरीसह जिवे मारण्याचा प्रयत्न या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वांद्रे पोलिस स्टेशनच्या पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या एका आरोपीची ओळख पटली आहे. आरोपी चोरीच्या उद्देशाने सैफ अली खानच्या घरात शिरला होता. आरोपीला लवकरच अटक केली जाईल. अटकेनंतर आम्ही तुम्हाला अधिक आणि सविस्तर माहिती देऊ, असं पोलिसांकडून सांगण्यात आले.

सैफ अली खानच्या बाजूच्या इमारतीमधून अज्ञात व्यक्तीची एन्ट्री–

एका सूत्राने एबीपी माझा सांगितले की, सैफ अली खानच्या इमारतीशेजारी 'पेटफिना' नावाचा एक खूप जुना बंगला आहे आणि असा संशय आहे की संबंधित चोर सैफ अली खानच्या इमारतीच्या कंपाऊंड वॉलवरून उडी मारून आत आला आहे. फॉरेन्सिक टीमने त्या भिंतीची आणि त्या जागेचीही तपासणी केली आहे. सूत्रांनुसार, ही भिंत ६–८ फूट उंच आहे आणि त्यावर चढणे इतके कठीण नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे की हा तोच बंगला आहे जिथे दिवंगत प्रसिद्ध अभिनेत्री तबस्सुम राहत होत्या, आता तिच्या कुटुंबातील इतर सदस्य तिथे राहतात. तबस्सुम यांचे २२ नोव्हेंबर २०२२ रोजी निधन झाले.

### कराड कुटुंबीयांची घेतली

शहर–तालुक्याचे ते आमदार आहेत, त्या शहरवासीयांकडे पाठ का? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

आवादा पवनचक्की कंपनीला खंडणी मागणीच्या प्रकरणात वाल्मीक कराड सीआयडी कार्यालयात सरेंडर झाल्यानंतर चौकशी करण्यात आली. त्याला १४ दिवसांची सीआयडी कोठडी देण्यात आली होती. मुदत संपल्यानंतर मंगळवारी पुन्हा कोर्टात हजर करण्यात येणार होते. या दरम्यान परळी पोलिस ठाण्यासमोर कराडच्या कुटुंबीयांनी ठिय्या आंदोलन केले. यानंतर कराड समर्थकांनी अचानक शहर बंदची हाक दिली. व्यापाऱ्यांनी धावपळीत शहर बंद केले. बुधवारी मंत्री धनंजय मुंडे यांनी कराड कुटुंबीयांची भेट घेतली. पण, परळीतील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मात्र व्यापाऱ्यांची भेट घेतली नाही. खरे पाहता अगोदरच कराड यांच्या दहशतीमुळे शहरातील अनेक व्यापाऱ्यांनी आपापले व्यापार बंद करून परळीतून पलायन केले. शहरातील व्यापाऱ्यांना मुक्तपणे व्यापार करू दिला जात नाही. व्यापाऱ्यांच्या अनेक एजन्सी हिसकावण्यात आल्याची चर्चा सातत्याने होते. त्याबरोबरच काही दिवसांपूर्वी परळीतील युवक व्यापाऱ्याचे खंडणीसाठी अपहरण करण्यात आले होते. आठ लाख दिल्यानंतर त्याची सुटका करण्यात आली होती. या व अशा अनेक कारणांमुळे परळी शहरातील व्यापारी दहशतीखाली आहेत. असे असताना कराड समर्थकांनी मंगळवारी मकोका लागल्यानंतर परळी बंद केले; पण समर्थकांच्या दहशतीमुळे दुसऱ्या दिवशीही व्यापाऱ्यांनी बंद पाळला. त्यामुळे मुंडे यांनी व्यापाऱ्यांची भेट घेणे अपेक्षित होते.

### सीडीआर काढायची

पोलीस स्टेशनबाहेर ठिय्या मांडला. मंगळवारी सायंकाळी वाल्मिक कराड याच्या पत्नीने पत्रकार परिषद घेऊन भाजप आमदार सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप करून तपास यंत्रणांवर संशय व्यक्त केला.

कॉल डिटेल्स रेकॉर्ड अर्थात सीडीआर काढायची एवढीच हौस आहे तर सुरेश धस यांचेही सीडीआर काढा म्हणजे त्यांचेही प्रताप समोर येतील. त्यांनी एसआयटीला किती फोन केले आणि एसआयटीमधील अधिकाऱ्यांनी धस यांना किती फोन केले, हे समोर येईल, अशी आक्रमक मागणी करून धस यांच्या सांगण्यावरूनच कारवाई होत असल्याचा आरोप कराड याच्या पत्नीने केला.

वंजारी समाज हा छोटा समाज आहे. आमच्या आजूबाजूला मराठा समाज आहे. त्यामुळे वंजारी समाजाला कसे दाबायचे, त्याला वरती येऊ द्यायचे नाही, असे षडयंत्र रचले गेले आहे. माझ्या नवऱ्याला अडकविण्यासाठी पूर्णपणे रणनीती आखली आहे. ज्याचा खून झाला त्याचा आणि माझ्या नवऱ्याचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. त्यांची साधी ओळख नाही, त्यांचा फोन नाही, ते परळीच्या बाहेर गेले नाहीत, केजमध्ये ते कशाला गेलेत? यावरून राजकारण किती खालच्या पातळीला गेले आहे, हे लक्षात येईल, असे कराडची पत्नी म्हणाली. तसेच एसआयटीतील काही अधिकारी सुरेश धस यांच्या सांगण्यावरून काम करीत असल्याचे म्हणत संबंधित अधिकाऱ्यांना एसआयटीतून बाहेर काढण्याची मागणी त्यांनी केली.

सुरेश धस यांच्या सांगण्यावरून हे सगळे केले जातेय. सुरेश धस यांना दोन नेत्यांना संपवायचे आहेत. वंजारी समाजाचे दोन नेते मंत्री झाल्याचे त्यांना खुपत आहे.हे सीएमसाहेबांनी ओळखून घ्यावे. मी त्यांनाच न्याय मागेन, ते याप्रकरणात लक्ष घालतील. कारण माझ्या नवऱ्याने प्रामाणिकपणे महायुतीचे काम केले. त्यांना आता न्याय देण्याची जबाबदारी मुख्यमंत्री महोदयांची आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्यायाचा शब्द आम्हाला द्यावा आणि बीडचे पोलीस अधीक्षक यांनी आमचे निवेदन स्वीकारावे, असे कराडची पत्नी म्हणाली.

परळी येथील पोलिस ठाण्यासमोर सुरू असलेल्या वाल्मीक कराड यांच्या समर्थक आणि कुटुंबीयांच्या आंदोलनामध्ये, काही वेळापूर्वी अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी भेट दिली आहे. यावेळी वाल्मीक कराड यांच्या आईची त्यांनी चर्चा केली. हे आंदोलन मागे घेण्यासाठी सकाळपासून दोन ते तीन वेळा पोलीस अधिकाऱ्यांनी कराड यांच्या आईशी बोलणं केला आहे. परंतु आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम असून आंदोलन मागे न घेण्याचा इशारा दिला आहे. सकाळपासून सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान वाल्मीक कराड यांच्या आईची प्रकृती देखील बिघडली होती. त्यानंतर डॉक्टरांनी देखील त्यांची या ठिकाणी तपासणी केली आहे. परंतु तरी देखील त्या आंदोलनातून माघार घ्यायला तयार नाहीत.

### बीड जिल्ह्यात आतापर्यंत

जिल्ह्यामध्ये खिरापत वाटल्याप्रमाणे यांना शस्त्र परवाने वाटण्यात आल्याचा आरोप करत हल्लाबोल केला होता. यावरून आरोपांच्या फैरी झडल्या होत्या. आता बीड प्रशासनाने वराधीमागून घोडे नेत कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत १६२ जणांचा पिस्तूल परवाना प्रशासनाकडून रद्द करण्यात आला आहे.

सर्वाधिक झटका गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना बसला असून ज्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत अशांपैकी १४० जणांचा परवाना रद्द करण्यात आला आहे. दरम्यान, काही ठिकाणी परवानाधारकाचा मृत्यू होऊन सुद्धा त्यांच्या नावाचा परवाना असल्याचे दिसून आले. २० परवाने या कारवाईमध्ये रद्द करण्यात आले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे आवश्यक नसताना सुद्धा पिस्तूल परवाना दिल्याची धक्कादायक माहिती आता तपासामध्ये समोर आली आहे. अजूनही पिस्तूल परवानाधारकांची झाडझडती बीडमध्ये सुरूच आहे. बीडमध्ये जवळपास एक हजार २८१ जणांना पिस्तूल परवाना देण्यात आले असून त्यामधील सर्वाधिक परळी तालुक्यामध्ये असल्याचा आरोप होत आहे. ज्यांच्यावर आतापर्यंत पिस्तूल परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात आली आहे त्यामधील बहुतांक्ष राजकीय पक्षांच्या संबंधित लोक आहेत. त्यामुळे संतोष देशमुख हत्येनंतर हवेत फैरी करणारे सुद्धा अडचणीत आले आहेत.

दुसरीकडे, खंडणीच्या गुन्ह्यात अटकेत असलेल्या वाल्मीक कराडवर मोका दाखल करण्यात आल्यानंतर सात दिवसांची एसआयटी कोठडी देण्यात आली. कराडला एसआयटीने बीड कोर्टात हजर केल्यानंतर कोर्टाने कराडला २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दुसरीकडे, एकाही आरोपीने वाल्मीक कराडचं नाव घेतलेलं नाही, त्यामुळे खुनाच्या गुन्ह्यात कराडच्या पोलीस कोठडीची आवश्यकता नाही, असा प्रतिवाद कराडच्या वकिलांकडून करण्यात आला. कोर्टाने दोन्ही बाजूच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर वाल्मीकला २२ जानेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

### संतोष देशमुख हत्या

घोषणा करण्यात आली आहे. मात्र, दुसरीकडे या हत्या प्रकरणातील एक मुख्य आरोपी अद्याप फरार आहे. अशातच आता हा आरोपी नाशिकमध्ये असल्याच्या चर्चांमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संशयित आरोपी कृष्णा आंधळे हा नाशिकरोड परिसरातील मुक्तिधाम मंदिराच्या भागात फिरत असल्याची चर्चा रंगली होती. या चर्चा सुरू असल्याची माहिती मिळताच नाशिक पोलिसांनी लगेच सर्च ऑपरेशन सुरू केलं आणि मंदिर परिसरातील उउढत फुटेज तपासले.

रात्रभर पोलिसांनी या भागात सर्च ऑपरेश केल्यानंतर सोशल मीडियावर कृष्णा आंधळे म्हणून जे फोटो व्हायरल होत होते ते कृष्णा आंधळेचे फोटो नसल्याचं पोलिसांनी स्पष्ट केलं. तसंच आंधळे नाशिकमध्ये असल्याच्या केवळ अफवा असल्याचंही पोलिसांनी सांगितलं.

दरम्यान, कृष्णा आंधळे नाशिकमध्ये असल्याचा दावा करण्यात आलेले फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यामुळे शहरात एकच खळबळ उडाली होती. मात्र, या सर्व चर्चा केवळ अफवा असल्याचं उपनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांनी सांगितलं. तसंच नागरिकांना खोट्या अफवांवर विश्वास ठेवू नये असं आवाहन देखील सपकाळे यांनी केलं आहे.

### वाल्मिकच्या मोबाइलमध्ये

साधला होता. याबाबतची कबुली स्वत: विष्णू चाटे यानं दिली होती. पोलिसांनी चाटे याचा फोन ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांना अद्याप चाटे याच्या फोनचा सुगावा लागला नाही. दरम्यान पोलिसांनी तपासासाठी वाल्मीक कराडचे दोन फोन जप्त केले होते. या फोनमधून खळबळजनक खुलासा झाला आहे.

पोलिसांनी वाल्मीक कराडचे जे तीन मोबाईल जप्त केले होते. त्यातील काही सीमकार्ड अमेरिकेत रजिस्टर करण्यात आल्याचं समोर आलं आहे. विधानसभा निवडणुकीच्या विशिष्ट काळात याच मोबाइलवरून काही लोकांना फोन केल्याचा संशय एसआयटीला आहे. आता वाल्मीकने हे फोन कुणाला केले? कशासाठी केले? याची माहिती अद्याप समोर आली नाही. मात्र त्याचे सीमकार्ड अमेरिकेत रजिस्टर असल्याने या प्रकरणात नवा ट्वीस्ट आल्याचं बघायला मिळत आहे. सध्या एसआयटीकडून वाल्मीकच्या अमेरिका कनेक्शनचा तपास केला जात आहे.

दुसरीकडे, वाल्मीक कराडवर मोक्का अंतर्गत कारवाई केल्यानंतर परळीत अनेक ठिकाणी आंदोलनं आणि निषेध मोर्चे काढण्यात आले आहेत. परळीतील एका तरुणाने तर चक्क पाण्याच्या टाकीवर चढून वाल्मीक कराडच्या सुटकेसाठी आंदोलन केलं. वाल्मीक कराडच्या आई आणि पत्नीही आंदोलनाच्या पावित्र्यात उतरल्या आहेत. या सगळ्या घडामोडींमुळे परळीतील राजकीय वातावरण तापलं आहे.

### बेकायदेशीर लाऊडस्पीकरवर

दिलेल्या आदेशाचे पालन न केल्याने सरकारविरोधात अवमान याचिका दाखल करण्यात आली. नवी मुंबईचे रहिवासी संतोष पाचलाग यांनी नवी मुंबईतील मशिदींवरील भोंग्यांवर कारवाई करण्यासंदर्भात २०१४ मध्ये उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर न्यायालयाने २०१६ मध्ये काही सरकरला काही निर्देश दिले. दोन वर्षांनंतर संतोष पाचलाग यांनी दाखल केलेल्या आरटीआयमध्ये चर्च, मंदिर, दर्गा, मशिदी, गुरुद्वारा आणि बुद्ध विहार अशा २,९४० धार्मिक स्थळांवर बेकायदेशीरपणे लाऊडस्पीकर लावल्याचे उत्तर देण्यात आले. त्यामुळे संतोष पाचलाग यांनी अवमान याचिका दाखल केली.

### मुंडे बहीण भावाने देशमुख

फरार आरोपीला कुणीतरी पळून जाण्यासाठी मदत करत आहे. अद्यापही हा आरोपी का सापडत नाही? असा प्रश्न उपस्थित करत हा आरोपी देखील लवकरात लवकर सापडणे आवश्यक आहे. असे म्हणत बजरंग सोनवणे यांनी आरोपी सापडण्याचा घटनाक्रम सांगितला. ते म्हणाले की, पहिल्या दिवशी दोन आरोपी सापडतात, जे साईड हिरो असतात. त्यानंतर तिसऱ्या आरोपीला पुण्यातून अटक करण्यात येते. चौथी आरोपी जो खंडणी आणि खुनाच्या गुन्ह्यात सामील आहे, तो देखील पुण्यामध्ये पोलिसांना शरण येतो. त्यानंतर दोन दिवसांनी आणखी दोन आरोपी देखील पुण्यातच पकडले जातात. त्यामुळे सुरुवातीपासून मी सातत्याने पुणे कनेक्शन असल्याचा बोलत आलो आहे, असे सोनवणे म्हणाले.

पुण्यातील प्राईम लोकेशन असलेल्या फर्ग्युसन रस्त्यावर कुशल वॉल स्ट्रिट येथे निर्माणाधीन इमारतीमध्ये वाल्मीक कराडने दोन ऑफिस स्पेस विकत घेतल्याचा दावा केला जात आहे. याप्रकरणी बजरंग सोनवणे यांना प्रश्न विचारला असता, ते म्हणाले की, अवैधरित्या मालमत्ता असतील तर चौकशी झाली पाहिजे. १०० कोटींच्या पुढे मालमत्ता असेल तर ईडीकडून तपास केला जातो, अशी मागणी सोनवणे यांनी केली.

दरम्यान, धनंजय मुंडे यांनी वाल्मीक कराडच्या कुटुंबाची भेट घेतल्याचा दावा केला जात आहे. याप्रकरणी प्रश्न विचारला रअसता बजरंग सोनवणे म्हणाले की, धनंजय मुंडे यांनी वाल्मीक कराडच्या कुटुंबीयांची भेट घेतली की नाही, हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. परंतु संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांनी त्यांच्या कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन करणे गरजेचे होते. संतोष देशमुख यांची हत्या झाली आहे. ती व्यक्ती आता आमच्यात नाही. त्यामुळे संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेण्याची गरज होती. तसेच पाच वर्ष जिल्ह्याबाहेर असलेल्या पंकजा मुंडे यांनी आता कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे सध्या परळी शांत ठेवणे ही तेथील लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. लोकप्रतिनिधींनी जबाबदारी झटकून चालणार नाही, असे म्हणत बजरंग सोनवणे यांनी मुंडे बहीण भावावर हल्लाबोल केला.

### वाल्मिक कराडसाठी

याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस– शरदचंद्र पवार पक्षाचे सोशल मीडिया फ्रंट प्रदेश अध्यक्ष महादेव बालगुडे यांनी एक्सवर माहिती दिली आहे. कराडच्या समर्थनार्थ पेटवून घेणाऱ्याचे नाव दत्ता जाधव राहणार फुलेनगर परळी असे आहे तर तीन वर्षांपूर्वीच्या बातमीनुसार कुंटणखाना चालवणाऱ्या ज्या महिलेला अटक झाली होती तिचे नाव जयश्री दत्ता जाधव राहणार फुलेनगर परळी असे आहे. असे अजून चांगले लोक कराडच्या समर्थनार्थ पुढे आले पाहिजेत, अशा आशयाची पोस्ट बालगुडे यांनी एक्सवर केली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे एखाद्या खंडणीखोर व्यक्तीला देवमाणूस म्हणणे कितीपत योग्य आहे? जर आपल्या आसपास अशा गुन्हेगारांसाठी स्वत:चा जीव धोक्यात घालणारे लोक असतील तर पुढे आपले भविष्य काय असेल? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेच्या मनात पडला आहे. अशा समाजकंटकांना आपण कोणाचे समर्थन करत आहोत? याचे गांभीर्य समजले पाहिजे.